aglasem.com

FOR KARNATAKA CLASS 10 PREPARATION

Karnataka SSLC Model Question Paper 2027 for Marathi First Language (Paper 2)

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
Karnataka Class 10	2027	Sample Paper	Marathi

08-M

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ
ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD
Malleshwaram, Bengaluru - 560 003

2026 - 27 ರ ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ – 2

S.S.L.C. MODEL QUESTION PAPER - 2 : 2026 - 27

ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

Subject : First Language — MARATHI

ವಿಷಯ ಸಂಕೇತ: **08-M** | **Subject Code : 08-M**

ಸಮಯ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು] | [Time : 3 Hours 15 Minutes

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : **100**] | [Max. Marks : **100**

विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1. प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
3. उजव्या बाजूच्या कडेला (काठावर) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
4. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

(Turn over)

08-M

I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. **6x1=6**

1. 'सदाचार' या संधीचा विग्रह असा होतो. -

   (अ) सत् + आचार (ब) सदा + चार

   (क) सद + आचार (ड) सदे + आचार

2. 'मुले मैदानावर क्रिकेट खेळेत होते.' या वाक्यातील काळ ओळखा -

   (अ) भविष्यकाळ (ब) अपूर्ण भूतकाळ

   (क) पूर्ण भूतकाळ (ड) वर्तमानकाळ

3. 'महासागर' हे या समासाचे उदाहरण आहे -

   (अ) बहुव्रीही समास (ब) अव्ययी समास

   (क) द्वंद्व समास (ड) कर्मधारय समास

4. 'गरज सरो.....' ही म्हण पूर्ण करा.

   (अ) बैल मरो (ब) सर्व मिळो

   (क) वैद्य मरो (ड) काम सरो

5. 'देव आहे असे मानणारा' या शब्दसमुहासाठी एक योग्य शब्द हा आहे-

   (अ) आस्तिक (ब) नास्तिक

   (क) पाक्षिक (ड) ध्येयवादी

6. 'भारत माझा देश आहे.' या वाक्यातील 'भारत' या शब्दाची जात ही आहे -

   (अ) विशेषन (ब) क्रियापद

   (क) नाम (ड) सर्वनाम

08-M

II) पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा. 4 x 1 = 4

7. षष्ठी विभक्ती : चा, ची, चे : : सप्तमी विभक्ती : .....

8. आजीने गोष्ट सांगीतली : कर्मणी प्रयोग : : मांजराने उंदाराला पकडले : .....

9. तनय : मुलगा : : वदन : .....

10. निंदा : स्तुती : : कृतज्ञ : .....

III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 7 x 1 = 7

11. बुधवारी काकूबाई कोठे गेल्या होत्या?

12. जपानमधील 'गृहिणी मंडळ' या संस्थेची स्थापना केव्हा झाली?

13. 'पैल तो गे काऊ कोकताहे' या कवितेचे मूल्य काय ?

14. काकूंनी कोणता निर्वाणीचा संदेश दिला ?

15. कवी कोणाशी बोलत आहे?

16. देशभक्तांनी आपल्या जीवनात कशाला संक्षेप दिला ?

17. गाव कशांनी वेढलेले आहे?

IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. 3 x 2 = 6

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    अ) हेलपाटा होणे

    ब) अवसान जाणे

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा :

    'झाडं म्हणजे आमची दोस्तमंडळीच.'

20. गण पाडून व्रत्त ओळखा.

    'मना सज्जना तू कडेनेच जावे'

08-M

V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा. **7 x 2 = 14**

21. वाटणीच्या घोळाने गणातात्यांच्या घरात काय काय घडत होते ?

22. 'कोपऱ्यातील छत्री घेऊ नका' असे दुकानदार लेखकाला का म्हणाला?

23. "दिर्घोद्योग व कष्ट करण्यानेच यश प्राप्त होते." संदर्भासह स्पष्टीकरण करा.

24. केसोबास यांचा परिचय लिहा.

25. पाहुणे कोठून आले आहेत असे आई मुलाला सांगते?

26. "गाई पांगता जीवाची रागामुळं व्हई आग" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

27. विंदा करंदीकर यांचा परिचय लिहा

VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा. **1 x 3 = 3**

28. अ) ग्रंथ हेच गुरु

किंवा

ब) जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी

VII. खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा. **10 x 3 = 30**

29. लढाईत जखमी लोकांसाठी व इतरांसाठी श्रीमंतांनी काय केले?

30. 'कमीज खाँ' यांच्यासमवेत झालेल्या स्त्रियांच्या क्लब पार्टीचे वर्णन करा.

31. टपरीपाशी उभ्या असलेल्या मुलाचे वर्णन डॉक्टरांनी कसे केले आहे?

32. सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या ते लिहा.

33. 'अण्णा वारल्यावर आईचे जगच खल्लास झाले होते' याचा अर्थ स्पष्ट करा.

34. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने कोणकोणते प्रयत्न केले ?

35. 'ही बार बार तलवार येईल का पुन्हा' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

36. कवीने कृष्ण, कर्ण व मार्कंडेय यांचे दाखले का दिलेले आहेत? ते स्पष्ट करा.

37. पृथ्वी सूर्याची याचना कशी करत आहे ? तिची सद्याची अवस्था कशी आहे ?

38. 'धरण' कवितेत स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे?

08-M

VIII. खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा. **4 x 4 = 16**

39. लेखकाने चाफा व बांबू या झाडांबद्दल कोणती माहिती सांगीतली आहे? ते सविस्तर लिहा.

किंवा

'हिरवे सांगाती' या शीर्षकाची यथार्थता स्पष्ट करा.

40. धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयातील वातावरण कसे होते? ते सविस्तर लिहा.

किंवा

गंगूबाईंच्या गळ्यावर शस्त्रक्रिया का करण्यात आली? त्याचा काय परिणाम झाला?

41. 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

कवच .....

.....

..... मृत्युवर.

किंवा

कोसळली .....

.....

..... सत्कार.

08-M

IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1 x 4 = 4

(2+2)

43. स्वप्ने ती नसतात जे आपण झोपेत पाहतो, स्वप्ने ती असतात जी आपल्याला झोपू देत नाहीत. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या आयुष्यात एक मोठे ध्येय निश्चित केले पाहिजे. परंतु केवळ मोठी स्वप्ने पाहुन चालत नाही, तर ती स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी अथांग कष्टांची आणि सातत्याची जोड द्यावी लागते. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, असे आपण म्हणतो; पण अपयशाने खचून न जाता, त्यातून धडा घेऊन पुन्हा उभे राहणे यातच खरे कौशल्य आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ घोकंपट्टी करुन मिळवलेले गुण तुम्हाला तात्पुरते यश देऊ शकतील, परंतु व्यावहारिक जीवनात यशस्वी होण्यासाठी तुमच्याकडे नाविन्यपूर्ण विचार आणि कल्पकता असणे आवश्यक आहे. समस्यांवर मात करण्याचे धाडस ज्या विद्यार्थ्यामध्ये असते, तोच भविष्यात देशाचा नेता किंवा शास्त्रज्ञ बनतो. तुमच्याकडे असलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकाचे जीवन सुंदर करण्यासाठी करा, हाच तुमच्या शिक्षणाचा खरा सन्मान असेल.

प्रश्न : अ) लेखकाच्या मते 'खरी स्वप्ने' कशी पूर्ण होतात ?

ब) व्यावहारिक जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्याकडे कोणकोणते गुण असणे आवश्यक आहे?

X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा. 1 x 5 =5

44. राज्यस्तरीय भाषण स्पर्धेत तुमच्या मित्राचा/ मैत्रिणीचा प्रथम क्रमांक आला आहे. त्याबद्दल पत्राद्वारे त्याचे/तिचे अभिनंदन करा.

किंवा

तुमच्या भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात ग्रामपंचायत किंवा महापालिकेच्या अधिकाऱ्यांना तक्रार अर्ज लिहा.

XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा. 1 x 5 = 5

45. अ) अंधश्रध्दा एक शाप

ब) झाडे नसती तर …!

❑❑